**MANAGEMENT COUNCIL**
**10th SEPTEMBER, 2024**

विषय क्र.६०- दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर अपलोड करावयाच्या सन २०२३-२४ मधील OL Programmes चा Centre for Internal Quality Assurance (CIQA) च्या तयार करणेत आलेल्या वार्षिक अहवालास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मान्यता देणेबाबत मा. कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही माहितीसाठी.

(सोबत CIQA वार्षिक अहवालाची प्रत जोडली आहे.)

टिपणी :विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी दि. ०१ जुलै २०२४ रोजीच्या ई-मेलनुसार UGC DEB वेब पोर्टलवर OL Programmes चा Centre for Internal Quality Assurance (CIQA) चा सन २०२३-२४ चा वार्षिक अहवाल सादर करण्याची तारीख दि. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत असल्याचे कळविले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या नमुन्यात या केंद्रामार्फत OL Programmes ची माहिती भरण्यात आली असून सदरचा सन २०२३-२४ चा तयार केलेला वार्षिक अहवाल अंतर्गत गुणवत्ता हमी केंद्राच्या दि. २०/०८/२०२४ रोजी झालेल्या बैठकीत सादर केला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव संमत झाला आहे.

Resolution : The OL Programmes Annual Report of CIQA prepared by Centre for Distance and Online Education for the Academic Year 2023-24 is approved and recommended to the Management Council for final approval.

उपरोक्त ठरावानुसार सदरचा वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करणे आवश्यक आहे. तथापि व्यवस्थापन परिषदेची बैठक दि. १० सप्टेंबर २०२४ रोजी नियोजित करणेत आली आहे. उपरोक्त बाबी अवलोकनी घेता या केंद्रामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर अपलोड करावयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी केंद्राच्या वार्षिक अहवालास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा. कुलगुरू यांनी मान्यता दिलेली आहे.

सबब, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर अपलोड करावयाच्या सन २०२३-२४ मधील OL Programmes चा Centre for Internal Quality Assurance (CIQA) च्या तयार करणेत आलेल्या वार्षिक

**MANAGEMENT COUNCIL**
**10th SEPTEMBER, 2024**

अहवालास -महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मान्यता देणेबाबत मा. कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही माहितीसाठी.)

ठराव : दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर अपलोड करावयाच्या सन २०२३-२४ मधील OL Programmes चा Centre for Internal Quality Assurance (CIQA) च्या तयार करणेत आलेल्या वार्षिक अहवालास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मान्यता देणेबाबत मा. कुलगुरू यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
सभा व निवडणूका विभाग
Shivaji University, Kolhapur